**अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार भाषा संचालनालय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांवर शारिरीकदृष्टया अपंगांसाठी केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : अपंनि-१०१०/१११६/प्र.क्र. २३९/२०-ब,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १३ जानेवारी, २०११**

**वाचा :-** (१) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दिनांक २ मे, १९९८
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ०४.०३.२००२
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.- संकीर्ण -२००५/५७१/प्र.क्र.४८/०५/२०-ब, दिनांक ३ ऑक्टोबर, २००५.
(५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक - न्यायाप्र-२००९/ प्र.क.५/सुधार-३, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१०.

**प्रस्तावना :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा क्रमांक १) हा अधिनियम ०७.०२.१९९६ पासुन लागू झाला आहे. या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्याकरिता अपंग व्यक्तींसाठी पदनिश्चिती केली आहे. त्यानुसार या विभागाच्या अखत्यारितील भाषा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ, ब, क व गट-ड मधील पदांवर शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी आरक्षण ठेवण्याकरिता संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक ३ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार पदनिश्चिती करण्यात आलेली आहे.

२. शासनाच्या विविध विभागांमार्फत अपंगांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या पदनिश्चितीमध्ये एकवाक्यता नाही किंवा ती परिपूर्ण नाही, यासाठी अपंग व्यक्तींसाठी सुधारीत पद निश्चिती करणे व त्या अनुषंगाने अपंगांची राखीव पदे भरणे या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करणेबाबतचे निदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक ५ येथील दिनांक ३ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारितील भाषा संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ संदर्भात शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपंगांसाठी आरक्षण सुनिश्चित करणेबाबतचे निर्देश दिले असल्याने उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दि. ३ ऑक्टोबर, २००५ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. शासनाने संदर्भ क्रमांक ५ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे भाषा संचालनालयाच्या आस्थापनेवरील अ, ब, क, व ड गटातील कोणत्या पदासाठी कोणत्या वर्गवारीतील अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवावे याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

१. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा क्रमांक १) या अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार भाषा संचालनालयाच्या आस्थापने अंतर्गत पदांवरील सरळ सेवा भरतीमध्ये या शासन निर्णयाच्या परिशिष्ट - अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असलेल्या अपंग व्यक्तींना प्रत्येकी १ टक्के याप्रमाणे ३ टक्के आरक्षण लागू राहिल.

२. विहित मार्गाने सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांकरिता अपंग उमेदवारांसाठी शारिरीक पात्रतेचे निकष सोबतच्या परिशिष्ट -अ प्रमाणे असतील. विहित मार्गाने उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवारांस शारिरीक पात्रतेसंदर्भात, संबंधीत विषयाच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच, अशा अपंग व्यक्तींची शासन सेवेत संबंधीत संवर्गात खाली दर्शविलेले निकष विचारात घेऊन नियुक्ती करण्यात येईल.

अ) संबंधीत पदांच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार अर्हताधारक असेल तर,

ब) त्या त्या संवर्गातील पदांची कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेऊन त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास,

क) पदोन्नतीच्या पदास व एकाकी पदास अपंगांचे आरक्षण लागू नाही.

३. अपंग व्यक्तींना शासकीय नियुक्तीकरिता योग्य ठरविलेल्या पदांवर सरळसेवेने नियुक्ती देणेबाबत संदर्भाधिन क्र. ३ येथील दिनांक ०४.०३.२००२ नुसार क्रमवार बिंदूनामावली व कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

४. सदर आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०३ ऑगस्ट, २०१० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०११४२१०२०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सोबत-परिशिष्ट

( अंजली अंभिरे )
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव

एच-३१६० -१३

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव/अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन मुंबई.
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता)मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा)मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १४/ १४-अ/ १४-ब/१६-अ/१९/१९-अ, मंत्रालय, मुंबई.
सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग/सुधार-३, मंत्रालय, मुंबई. (५ प्रती )
उप सचिव, (सेवा) / उप सचिव (प्रशासन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.मुंबई
सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नवीमुंबई.
निवड नस्ती. (का.२०ब)

मुद्रा-३४६०]३५०-९-२०११[-३

परिशिष्ट-अ

**शांसन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. : अपनि-१०१०/१११६/प्र.क्र. २३९/२०-ब,**

**दिनांक : १३जानेवारी, २०११ चे सहपत्र.**

**भाषा संचालक या कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट अ, ब, क व ड मध्ये सरळसेवा भरतीच्या पदावर केंद्र शासनाच्या निकषानुसार अपंग व्यक्तींसाठी शारिरीक पात्रतेचे सुधारित निकष**

| अ. क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदांसाठी अपंगांची वर्गवारी | पदाची कर्तव्य व ज॰ बदाऱ्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ |
| १ | भाषा उपसंचालक (विधी) गट-अ | **S.ST.W.RW.C.MF.SE** | **OL.BL.OAOALB.L.V. HH.** | विधी विषयक अनुवाद करणे व तपासणे, विधी विषयक परिभाषा व शब्दावली तयार करणे व सहायक भाषा संचालक यांना मार्गदर्शन करणे. विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समितीचे कामकाज पहाणे. | एकाकी पद |
| २ | भाषा उपसंचालक (अनुवाद व शब्दावली) गट-अ | **S.ST.W.RW.C.MF.SE** | **OL.BL.OA.OAL.B.LV. HH.** | महत्त्वाचा अनुवाद तपासणे, विद्यापिठ स्तरावरील परिभाषा व वेगवेगळ्या विषयाची शब्दावली तयार करणे, अर्थसंकल्पीय प्रकरणे, विभागीय नियम पुस्तिका प्रमाण व विशेष नमुने वेगवेगळ्या शासकीय समित्यांचे अहवाल इ.चा अनुवाद करणे व तपासणे, सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) यांच्यावर पर्यवेक्षण व मार्गदर्शन करणे | एकाकी पद |
| ३ | सहाय्यक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)/ विभागीय सहाय्यक भाषा संचालक गट-ब | **S.SE.RW.** | **OL.BL.OA.B.LV.HH.** | मराठी अनुवाद करणे व तपासणे, पर्यवेक्षकांना अनुवादाच्या कामाबाबत मार्गदर्शन करणे विभागीय कार्यालयांचे कार्यालय प्रमुख म्हणून काम पहाणे, अल्पसंख्यांक भाषेतील अनुवादाबाबत काम पहाणे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक भाषा संचालक (प्राशक्षण व आस्थापना) गट-ब | S.RW.SE.MW.C. | OL.OA.BL.HH.B.LV. | आस्थापना व लेखा विषयक कामे पहाणे, मराठी भाषा, हिंदी भाषा व मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षेबाबतची कामे पहाणे. | एकाकी व पदोन्नतीचे पद |
| ५ | भाषा अधिकारी (हिंदी) गट-ब | S.SE.RW.C. | OL.B.LV.HH. | शासकीय आदेश, परिपत्रके, अधिनियम इतर अल्पसंख्यांक भाषेतील अनुवाद करणे व तपासणे. | एकाकी पद |
| ७ | भाषा अधिकारी (कन्नड) गट-ब | S.SE.RW.C. | OL.B.LV.HH. | शासकीय आदेश, परिपत्रके, अधिनियम इतर अल्पसंख्यांक भाषेतील अनुवाद करणे व तपासणे. | एकाकी पद |
| ८ | उच्चश्रेणी लघु लेखक गट-ब (अराजपत्रित) | | B/LV | भाषा संचालकांचे स्वीय सहायक व लघुलेखक म्हणून काम करणे, गोपनीय तसेच महत्त्वाची पत्रे व टिप्पण्या टंकलिखित करणे. | एकाकी पद |
| ९ | अधीक्षक गट-ब (अराजपत्रित) | S.ST.W.SE. RW.H.C. | OL.OA.BL.OAL.B.LV.HH. | महत्त्वाची धोरणविषयक कामे करणे, वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक यांनी सादर केलेली प्रकरणे तपासणे व त्याला मार्गदर्शन करणे. | पदोन्नतीची पदे |
| १० | पर्यवेक्षक गट-ब (अराजपत्रित) | S.SE.RW. | OL.OA.BL.OAL.B.LV.HH. | अनुवादकांनी केलेला अनुवाद व मुद्रिते तपासणे, अनुवादकांना मार्गदर्शन करणे | पदोन्नतीची पदे |
| ११ | अनुवादक (मराठी/हिंदी) गट-क | S.SE.RW. | OA.OL.OAL.BL.B.LV.HH. | अनुवादाचे काम करणे, मुद्रित वाचन करणे, कोश लेखन करणे व त्या अनुषंगिक इतर कामे करणे. | -- |
| १२ | वरीष्ठ लिपीक गट-क | S.ST.W.RW.H.C. | OA.OL.BL.OAL.B.LV.HH. | रोजचे टपाल पाहून टिपपण्या व प्रारुपे सादर करणे, आस्थापना / लेखा / परीक्षा / प्रशिक्षण व शासन व्यवहारात मराठीचा वापरविषयक सर्व कामे करणे. | पदोन्नतीची पदे |
| १३ | लघु टंकलेखक (मराठी) गट-क | S.ST.W.L.MF.SE.RW .H.C. | OA.OL.BL. OAL.B.L.V. | श्रुतलेखनाचे व टंकलेखनाचे काम करणे. | -- |
| १४ | कनिष्ट ग्रंथपाल गट-क | S.BN.MF.SE. RW.C. | OA.OL. OAL. BL.HH. | ग्रंथालयाची सर्व कामे करणे. | एकाकी पद |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | वाहनचालक<br>गट-क | | -- | कार्यालयाचे वाहन चालविणे व वाहन सुस्थितीत ठेवणे | सूट |
| १६ | नाईक<br>गट-ड | S.ST.W.F.PP.L.<br>KC.B.SE.H. | OL. HH.LV/B | चपराशांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे | पदोन्नतीचे पद |
| १७ | चपराशी<br>गट-ड | S.ST.W.F.PP.L.<br>KC.B.SE.H. | OL.HH.LV/B | कार्यालय उघडणे, बंद करणे, कार्यालयीन जडवस्तू सामानाची साफसफाई पत्रवाटप इ. कामे करणे, चपराशी पदाची सर्व कामे करणे. | -- |

**ABBREVATIONS USED :- S=Sitting, BN=Bending, SE=Seeing, RW=Reading & Writing, C=Communication, MF=Manipulation by Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting, KC=Kneeling & Croutching, ST=Standing, W=Walking, BLA=Both Legs & Arms, BA=Both Arms, OL=One Leg, BL=Both Leg, OA=One Arm, OAL=One Arm & One Leg, B=Blind, LV=Low Vision,H=Hearing, MW=Muscular Weakness, OH=Orthopaedically Handicapped, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, VH=Visually Handicapped, HH=Hearing Handicapped.**

---